**कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या खाजगी माध्यमिक शाळांना अनुदानासाठी पात्र घोषित करण्याबाबत .**

**दिनांक १ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र-अ मध्ये दुरूस्ती करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन शुध्दीपत्र क्रमांक :-माशामु-२०१६/(११/१६)/२०१६/एसएम-४**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० जानेवारी, २०२२.

वाचा :- (१) शासन निर्णय क्रमांक माशामु-२०१६/(११/१६)/२०१६/एसएम-४, दि.१ जूलै, २०१६.
(२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र. शिआ/२०२०/शिक्षकेत्तर पदे दुरुस्ती/ आस्था क-१४४/४७७४, दि. १५/११/२०२१.

**शासन शुध्दीपत्र** :-

कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या खाजगी माध्यमिक शाळांना अनुदानासाठी पात्र घोषित करण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर शासन निर्णयासोबत **प्रपत्र-अ** मध्ये अ.क्र. १५४ वर श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित गुरुकूल माध्यमिक विद्यालय, सासवड, ता. पुरंदर,जि.पुणे या शाळेचे इयत्ता ८ वी ते १० वी चे वर्ग व अ.क्र. १५५ वर श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित कानिफनाथ माध्यमिक विद्यालय, बोपगांव, ता. पुरंदर,जि.पुणे या शाळेचे इयत्ता ८ वी ते १० वी चे वर्ग अनुदानास पात्र घोषित केले आहे.

२. संदर्भ-२ येथील आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्राच्या अनुषंगाने, संदर्भ-१ येथील शासन निर्णय दिनांक १ जुलै, २०१६ मध्ये प्रपत्र-अ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | इयत्ता/ वर्ग | अनुदानास पात्र ठरणारी पदे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुख्याध्यापक | प्रशि. पदविधर शिक्षक | लिपिक | शिपाई | एकूण |
| १५४ | श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित गुरुकुल माध्यमिक विद्यालय, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे | इ. ८ वी ते १० वी | १ | ४ | १ | १ | ७ |
| १५५ | श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित कानिफनाथ माध्यमिक विद्यालय, बोपगांव, ता. पुरंदर, जि. पुणे | इ. ८ वी ते १० वी | १ | ४ | १ | १ | ७ |

३. शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती तशाच कायम राहतील.

४. सदर शासन शुध्दीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०१२०१५०६५९४८२१ असा आहे. हे शुध्दीपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by TIKARAM WAMAN KARPATE
Date: 2022.01.20 15:12:46 +05'30'

**( टि. वा. करपते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
३. शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे,
४. निवडनस्ती (एसएम-४).